जिल्हा परिषद, लातूर.
पशुसंवर्धन विभाग
कार्यासन :- ०५
दिनांक :- 24/9/10
अधि.का.अ. प.वि.अ. जि.प.अ. अति.मु.का.अ.

2314
जिल्हा परिषद, लातूर.
आवक-टपाल क्र.
विभाग प.सं.
दिनांक 21 SEP 2010
अधी. उप मुकाअ (सा.)
अति. मुकाअ / मुकाअ

**जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत राबवावयाच्या योजनांबाबत (सर्वसाधारण योजना) पशुवैद्यकीय संस्थांचे बांधकाम, बळकटीकरण व आधुनिकिकरण.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: जिवायो-२०१०/प्र.क्र.२९१/पदुम-४**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२**
**दिनांक : ३० ऑगस्ट, २०१०**

**वाचा:** १. शासन नियोजन विभागाचे पत्र क्रमांक जिवायो-१००९/प्र.क्र.२१३/का.१४८१ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ३० डिसेंबर, २००९.

**प्रस्तावना** - शासन निर्णय क्र.पसंप्र-१००१/प्र.क्र.२९(भाग-४)/पदुम-१, दि. २५.५.२००४ नुसार पशुसंवर्धन विभागाची पुर्नरचना करण्यांत आली असून त्यानुसार जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा, पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१, पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, फिरते पशुवैद्यकीय दवाखाने या संस्थां मार्फत पशुवैद्यकीय सेवा देण्यात येत आहे. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्या प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रणा खाली सदर पशुवैद्यकीय संस्था कार्यान्वित आहेत. या संस्थांचे जिल्हास्तरीय योजने अंतर्गत बांधकाम, बळकटीकरण व आधुनिकीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुसार खालील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यांत येत आहे.

**शासन निर्णय:**

जिल्हा वार्षिक योजने (सर्वसाधारण योजना) अंतर्गत **पशुवैद्यकीय संस्थांचे बांधकाम, बळकटीकरण व आधुनिकिकरण** ही योजना सन २०१०-११ पासून राज्यात राबविण्यास याव्दारे शासनाची प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. या योजने अंतर्गत खालील कार्यक्रम राबविण्यात यावेत.

**अ. पशुवैद्यकिय संस्थांचे बांधकाम.**

१. पशुवैद्यकीय संस्थांमार्फत शेतकऱ्यांच्या पशुधनाला पशुवैद्यकीय सेवा पुरविणेसाठी राज्यात जिल्हा पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालये, तालुका लघुपशुवैद्यकिय सर्वचिकित्सालये, पशुवैद्यकिय दवाखाने श्रेणी-१, पशुवैद्यकिय दवाखाने श्रेणी-२, व फिरते पशुवैद्यकिय दवाखाने कार्यान्वीत आहेत. तसेच पशुधनाला अनुषंगीक सेवा पुरविणेसाठी जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रे व विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा या संस्था कार्यान्वीत आहेत. पशुवैद्यकीय सेवा सक्षमतेने व सुलभपणे पुरविण्यासाठी या सर्व संस्था स्वतःच्या इमारतीमध्ये कार्यान्वीत असणे आवश्यक आहे. तसेच या सेवा अविरत उपलब्ध होणेसाठी त्याच ठिकाणी निवासी इमारती असणे आवश्यक आहे. या सर्व निवासी व बिगर निवासी इमारती सुस्थितीत असणेही आवश्यक आहे. यासाठी राज्यस्तरीय व स्थानिकस्तरीय पशुवैद्यकिय संस्थांच्या निवासी व बिगरनिवासी इमारतींचे बांधकामासाठी जिल्हा नियोजन समितीकडे निधी प्रस्तावित करण्यात यावा.

२. राज्यस्तरीय व स्थानिकस्तरीय पशुवैद्यकिय संस्थांचे बांधकाम या योजनेअंतर्गत घेण्यात याबीत. पशुवैद्यकिय संस्थांच्या निवासी व बिगर निवासी इमारतींचे बांधकाम करणेसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून सदर जागा शासनाचे / जिल्हा परिषदेचे नावे नोंदविण्यात यावी. दिनांक २५/०५/२००४ च्या पुनर्रचनेच्या शासन निर्णयानुसार नव्याने निर्माण केलेल्या तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाच्या ठिकाणी पुर्वी कार्यरत असलेल्या पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ ची जागा तसेच निवासी व बिगर निवासी बांधकामे जिल्हा परिषदांनी आयुक्त पशुसंवर्धन यांचे नावावर त्वरीत हस्तांतरीत कराव्यात.

३. जागा उपलब्ध झाल्यानंतर ज्या इमारतींच्या बांधकामाचे मंजूर आराखडे उपलब्ध आहेत त्यानुसार अशा ठिकाणी नकाशे व अंदाजपत्रक तयार करण्यात यावे व त्यानुसार इमारत बांधकामासाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधी उपलब्ध करुन घेण्यात यावा.

४. पशुवैद्यकीय संस्थांच्या बांधकामासाठी निधी ज्या वर्षी प्राप्त होईल त्याच वर्षी किंवा जास्तीत जास्त दोन वर्षात इमारत बांधकाम पूर्ण करण्यात यावे, यासाठी जिल्हा नियोजन समितीने इमारत बांधकामासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन द्यावा ज्यामुळे त्याच कामासाठी पुनः पुनः निधीची मागणी करावी लागणार नाही. मात्र अपवादात्मक परिस्थीतीत जर बांधकाम त्या दोन वर्षात पूर्ण होऊ शकले नाही तर स्पिल ओव्हर कामासाठी देखील तरतूद प्राप्त करून घ्यावी.

**ब. पशुवैद्यकीय संस्थांची स्थापना, आधुनिकीकरण व बळकटीकरण करणे.**

१. पशुवैद्यकीय संस्थांना (जिल्हा पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालये, तालुका लघुपशुवैद्यकिय सर्वचिकित्सालये, पशुवैद्यकिय दवाखाने श्रेणी-१, पशुवैद्यकिय दवाखाने श्रेणी-२, फिरते पशुवैद्यकिय दवाखाने, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रे व विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा) आवश्यक असणारे साहित्य, उपकरणे, यंत्रसामुग्री, उपकरणे, डायग्नोस्टिक किट्स, स्टेन्स, कॅमिकल्स, रिएजंट, औषधे, द्रवनत्र, द्रवनत्र वाहतुक, बदली वाहन यासाठी निधी प्रस्तावित करावा. आयुक्त पशुसंवर्धन यांनी संस्थानिहाय निश्चित करून दिलेल्या यादीनुसार हत्यारे, उपकरणे व यंत्रसामुग्री इ. घेण्यात यावेत.

२. शासन निर्णय क्र.पसंप्र १००१/प्र.क्र.२९/(भाग-४)/पदुम-१, दि.२५.५.०४ अन्वये राज्यात एकूण १७२ तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. या तालुका लघुपशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालयामार्फत तज्ञ पशुवैद्यकांकडून अत्याधुनिक यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने रोगनिदान करुन आवश्यक उपचाराच्या सुविधा पुरविल्या जातात. या तालुक्यांव्यतिरीक्त राज्यातील ज्या तालुक्यात तालुका लघुपशुवैद्यकिय सर्व चिकीत्सालय कार्यरत नाही अशा तालुक्याच्या ठिकाणी नवीन तालुका लघु पशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालय स्थापन करणेसाठी तसेच अस्तित्वातील/कार्यान्वित असलेले तालुका लघुपशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालयाच्या आधुनिकीकरण व बळकटीकरणासाठी आवश्यक निधी या योजने अंतर्गत जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्तावित करण्यात यावा.

३. नवीन तालुका लघुपशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालय प्रस्तावित करीत असताना तेथील मुळ पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी-१ चे रुपांतर तालुका लघुपशुवैद्यकिय सर्व चिकीत्सालयात करण्यात यावे. तेथील पशुवैद्यकिय दवाखान्यातील पशुधन विकास अधिकारी हे पद रुपांतरीत तालुका लघुपशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालयात समायोजित करुन तेथील पशुवैद्यकिय दवाखाना बंद करण्यात यावा. या दवाखान्यातील मंजूर वर्ग ३ व ४ च्या पदावरील जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची नियुक्ती संबंधित जिल्हा परिषदांनी इतरत्र करावी. ज्या तालुक्यांत मंजूर निकषांप्रमाणे नवीन पशुवैद्यकिय दवाखाना स्थापन करणेस वाव नाही अशा तालुक्यांच्या मुख्यालयी कार्यरत असलेल्या पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी-१ चे तालुका लघुपशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालयात रुपांतर प्रथम प्राधान्याने करण्यात यावे.

४. **नवीन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ स्थापने संदर्भात स्वतंत्र मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यांत येणार आहेत. तोपर्यंत नवीन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ च्या स्थापनेसाठी जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी करू नये.** तथापि, जिल्हास्तरीय योजने अंतर्गत यापूर्वी शासन मंजूरी मिळालेल्या पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ करिता वेतनोत्तर बाबीसाठी जिल्हा नियोजन समितीकडे निधी प्रस्तावित करण्यात यावा व तेथील कर्मचारी/अधिकारी यांच्या आस्थापना अनुदानासाठी सदर पदे योजनेत्तर योजनेत हस्तांतरीत होईपर्यंत राज्य योजनेतून (State Plan) निधी प्रस्तावित करावा.

५. राज्यात भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा, १९८४ लागू असून या कायद्याप्रमाणे राज्यातील पशुपालकांना पशुवैद्यकीय पदवीधरांकडून पशुवैद्यकीय सेवा देणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यात सध्या कार्यरत असलेल्या सर्व पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी-२ यांचा टप्प्या टप्प्याने दर्जावाढ करणे आवश्यक आहे. यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे आवश्यकतेनुसार निधीची मागणी प्रस्तावित करावी.

६. राज्यातील सर्व पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी-२ यांचा टप्प्या टप्प्याने दर्जावाढ करणे साठी प्राधान्याने ज्या पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी-२ यांचे ठिकाणी दैनंदिन पशुरुग्ण सरासरी १० किंवा त्यापेक्षा जास्त आहे. अशा पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी-२ यांचा दर्जावाढ करणेसाठी प्राधान्याने निधीची मागणी करावी. तसेच तालुक्याच्या मुख्यालयी पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ कार्यरत असल्यास अशा पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ चा दर्जावाढ प्राधान्याने प्रस्तावीत करावा.

**प्रस्तुत योजना राबवण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधी प्राप्त करून घेणे. योजनांतर्गत प्रस्तावास मंजूरी देणे इ. साठी खालील कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी.**

१. वरील निकषांनुसार जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त/जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रस्तावित केलेल्या नवीन तालुका लघु पशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालयाच्या स्थापना/दर्जावाढ प्रस्तावावर प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचे अभिप्राय घेवून सदर प्रस्ताव आयुक्त पशुसंवर्धन यांचकडे सादर करावा.

२. आयुक्त पशुसंवर्धन यांनी सदर प्रस्तावांची छाननी करुन वरील निकष व प्राधान्यक्रम निश्चित करुन असे प्रस्ताव प्रतिस्वाक्षरी करून संबंधित जिल्ह्याकडे परत करावेत.

३. आयुक्त पशुसंवर्धन यांनी नवीन तालुका लघु पशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालयाच्या स्थापनेसाठी/पशुवैद्यकीय दवाखाना दर्जावाढसाठी मंजूर आकृतीबंधाप्रमाणे नवीन पदेनिर्मितीसाठी आवश्यक आस्थापना निधी राज्य योजनेतून (State Plan) अर्थसंकल्पित करुन नवीन पदेनिर्मितीचा प्रस्ताव शासनाचे मंजूरीस्तव सादर करावा. आयुक्त पशुसंवर्धन यांनी सदर नवीन पदे निर्माण झाल्यानंतर तेथील अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापना अनुदानासाठी सदर पदे योजनेतर योजनेत हस्तांतरीत होईपर्यंत निधी राज्य योजनेतून (State Plan) अर्थसंकल्पित करावा.

४. नवीन तालुका लघु पशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालयाच्या स्थापना/पशुवैद्यकीय दवाखाना दर्जावाढसाठी पदेनिर्मितीस शासन मंजूरी मिळाल्यानंतर आस्थापना अनुदानाव्यतिरीक्त इतर अनुषंगीक बाबींसाठी आवश्यक असणाऱ्या तरतूदींची मागणी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त/जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हा नियोजन समितीकडे करावी.

५. संबंधित जिल्हा परिषदांनी नवीन तालुका लघु पशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालयाच्या पदेनिर्मितीस शासन मंजूरी मिळाल्यानंतर सदर पशुवैद्यकिय दवाखाने श्रेणी-१ यांची जागा व इमारत आयुक्त पशुसंवर्धन यांचे नावावर हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करावी.

६. आयुक्त पशुसंवर्धन यांनी प्रतिस्वाक्षरी केलेले प्रस्ताव जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी जिल्हा नियोजन समितीकडे निधी उपलब्धतेसाठी सादर करावेत.

७. कोणत्याही परिस्थितीत नवीन तालुका लघु पशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालय स्थापन/पशुवैद्यकीय दवाखाना दर्जावाढ करण्याचे प्रस्ताव आयुक्त पशुसंवर्धन यांचे सहमतीशिवाय/प्रतिस्वाक्षरीशिवाय परस्पर जिल्हा नियोजन समित्यांकडे सादर करण्यात येवू नयेत.

८. नव्याने स्थापन करावयाच्या तालुका लघु पशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालय/पशुवैद्यकीय दवाखाना दर्जावाढ यांच्या स्थाननिश्चितीस जिल्हा नियोजन समितीची मान्यता प्राप्त करुन घेण्यात यावी.

९. पशुवैद्यकीय संस्थांसाठी विविध बांधकामे करणे त्याचप्रमाणे औषधी, उपकरणे, हत्यारे इ. खरेदी विहित शासकीय पध्दतीचा विलंब करून करण्यात यावी. **नवीन साहित्यांची खरेदी करण्यापुर्वी संस्थेत पुर्वीचे नादुरुस्त साहित्य असल्यास त्याचे नियमाप्रमाणे प्रत्यक्ष निर्लेखन करण्यात यावे. निर्लेखनाशिवाय त्याच नवीन साहित्यांची खरेदी करण्यात येवू नये.**

१०. पशुवैद्यकिय संस्थांसाठी विविध बाबींची खरेदी करण्यासाठी तांत्रिक मंजूरी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांनी द्यावी. तसेच शासन नियोजन विभाग शासन नियोजन विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-१००७/प्र.क्र.३९/का-१४४४, दि. १६/२/२००८ नुसार प्रशासकीय मंजूरी जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद यांच्याकडून प्राप्त करून घ्यावी.

११. या योजने अंतर्गत स्थानिकस्तरीय संस्थांसाठी पशुवैद्यकिय संस्थांसाठी २४०३-पशुसंवर्धन या लेखाशिर्षाखाली ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबी अंतर्गत तसेच राज्य स्तरीय पशुवैद्यकिय संस्थांसाठी करावयाच्या संस्थांसाठी आवश्यकते नुसार २४०३-पशुसंवर्धन या लेखाशिर्षाखाली १३-कार्यालयीन खर्च, २१-साहित्य पूरवठा व ५२-यंत्रसामुग्री व साधनसामुग्री या बाबी अंतर्गत निधी प्रस्तावीत करावा.

१२. बांधकामासाठी राज्यस्तरीय पशुवैद्यकिय संस्थांसाठी ४४०३-पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च या लेखाशिर्षाखाली ५३-मोठी बांधकामे या बाबी अंतर्गत निधी अर्थसंकल्पीत करण्यात यावा.

१३. ज्या जिल्ह्यातील जिल्हा योजनेमध्ये ४४०३-पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च हे मंजूर लेखाशिर्ष उपलब्ध नाही, अशाठिकाणी संबंधीत जिल्हाधिकारी यांनी नियोजन विभागाच्या योजना माहिती प्रणालीवर (MPSIMS) ४४०३-पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च हे लेखाशिर्ष नोंदवून नियोजन विभागास प्रस्ताव सादर करून लेखाशिर्ष उपलब्ध करून घ्यावे व त्या नंतर सदर बाबी अंतर्गत निधी अर्थसंकल्पीत करावा.

१४. सदर योजनेचे कार्यान्वयीन अधिकारी राज्य स्तरीय संस्थांसाठी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त आणि जिल्हा परिषदेअंतर्गत संस्थांसाठी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद हे राहतील. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त हे विभागीय सनियंत्रण अधिकारी राहतील तर संपूर्ण राज्याकरिता अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन सनियंत्रण अधिकारी राहतील.

१५. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त/जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय/फिरता पशुवैद्यकीय दवाखान्याचे पूर्वीचे नादुरूस्त वाहन नियमाप्रमाणे निर्लेखन करण्यात यावेत. वित्त विभागाच्या मान्यतेशिवाय बदली वाहनाची खरेदी करण्यांत येवू नये.

१६. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त/जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद या प्रशासकीय कार्यालयाच्या बळकटीकरणासाठी या योजने अंतर्गत एकूण प्राप्त निधीच्या १० टक्के निधीचा विनियोग करण्यात यावा.

हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३४९०/१४८१, दि. १३.८.२०१० अन्वये तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४९७/१०/व्यय-२, दि. २४.८.२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००८३१११३४४३७००१ आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,**

**(डॉ. मा.ना. सवाईसोमकांबळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत -

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय) यांचे खाजगी सचिव
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल-१/२, मुंबई/नागपूर
प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व)
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व)
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व)
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय (सर्व)
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई
अवर सचिव पदुम-३/१६, कक्ष अधिकारी पदुम-१/१३अ, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती

D:\GR 17062010\GR VD Est.doc